**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)**

मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि.अहिल्यानगर पिन.४२३१०९

फोन नं. (०२४२३) २५८५००/२५८७७१/२५८७७२ फॅक्स नं.२५८८७०

(Websitewww.sai.org.in , E-mail – purchase@sai.org.in)

## जाहीर ई-निविदा सूचना

श्री साईबाबा संस्थानचे प्रसादालय, लाडू निर्मिती, मंदिर व कॅन्टीन विभागासाठी सन २०२६-२७ वर्षाकरीता किराणामाल व अनुषंगिक साहित्य खरेदीकामी पुरवठादार, वितरक व उत्पादकांकडून ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

१. ई-निविदेचे निकष, अटी-शर्ती व माहितीसाठी श्री साईबाबा संस्थानचे www.sai.org.in /tender यासंकेतस्थळाला भेट द्यावी.

२. सदर ई-निविदा ऑनलाईन डाऊनलोडींग व अपलोडींगसाठी दि.२८ / ०१ /२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून ते दि.१४/ ०२ /२०२६ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

**(गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**शिरडी ४२३ १०९.**

**तालुका-राहाता, जिल्हा- अहिल्यानगर**

दुरध्वनी क्रमांक (०-२४२३) २५८५००, खरेदी विभाग- २५८७७१, २५८७७२,
फॅक्स क्रमांक -०२४२३-२५८८७०
Website – www.sai.org.in E-mail 1.saibaba@sai.org.in2.purchase@sai.org.in

**मुंबई कार्यालय**-साईनिकेतन, ८०४ बी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, दादर
मुंबई-४०० ०१४ दूरध्वनी क्रमांक (०२२) २४१६६५५६, २४१६१२९३


## सन २०२६-२७

## एप्रिल-२०२६ ते मार्च-२०२७

## श्री साईबाबा संस्थानचे प्रसादालय, लाडू निर्मिती, कॅन्टीन व मंदिर विभागांसाठी मसाले पुरविणेबाबत ई-निविदा

**A.** **निविदेचा तपशिल- श्री साईबाबा संस्थानचे प्रसादालय, लाडू निर्मिती, कॅन्टीन व मंदिर विभागांसाठी मसाले पुरविणेबाबत ई-निविदा**

**B.** **ई-निविदेसोबत सादर करावयाची कागदपत्रे, आर्थिक उलाढालीचे निकष वगैरे तपशील खालीलप्रमाणे-**

१. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने अदययावत दुकान नोंदणी दाखला/स्थानिक स्वराज्य संस्थेचा दाखला/ तत्सम शासकीय परवाना/भागीदारी संस्था असल्यास अद्यावत भागीदारी प्रमाणीत(पॉवर ऑफ अटर्नी) केल्याची प्रत/संस्था, कंपनी नोंदणी प्रमाणपत्र/खाजगी कंपनी प्रमाणपत्र/सोसायटी/गर्व्हमेंट अन्डरटेकींग/कंपनी नोंदणी प्रमाणपत्र/पार्टनरशिप डिड (निबंधकाकडून नोंदणी केलेल्या), आर्टीकल ऑफ असोसिएशन, सोसायटी रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

२. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने GST नोंदणी दाखला अगर GST Online Registration Receipt ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

३. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने अदयावत FSSAI परवाना ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

४. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने पॅन कार्डऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

५. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या फर्मची सन २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५ या ३ आर्थिक वर्षांची किमान वार्षिक सरासरी उलाढाल रक्कम **रू.१,२५,००,०००/- (रू.एक कोटी पंचवीस लाख)** असणे अनिवार्य राहील._ तसे उलाढाल नमुद असणारे व निविदेसोबत दिलेल्या नमुन्याप्रमाणे सी.ए यांचे प्रमाणपत्र ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

**C.** **निविदाधारकाने मालाचे नमुने सादर करण्याची पध्दत**

१. निविदाधारकाने निविदा भरलेल्या मालाचे ३०० ग्रॅम वजनाचे नमुने स्वतंत्र कापडी पिशवीमध्ये सिलबंद करून भरलेल्या आयटेम्सची यादी संस्थानच्या खरेदी विभागामध्ये विहित मुदतीत जमा करणे अनिवार्य राहिल. कापडी पिशवीवर मालाचे नांव/प्रकार तसेच आपले फर्मचे नांव लिहिलेले असावे. दिलेले नमुने कोणत्याही सबबीवर परत केले जाणार नाहीत अगर बदलता येणार नाहीत.

२. एका वस्तु/साहित्यासाठी उच्चतम दर्जाचा एकच नमुना सादर करावा. एका मालासाठी दोन किंवा अधिक नमुने सादर करू नये. तसे केल्यास एकाच नमुन्यांचा विचार केला जाईल.

३. निविदा भरलेल्या मालाचे नमुने सादर करतांना सोबत त्याची यादर सादर करणे आवश्यक आहे.

४. निविदाधारकाने किराणामालाचे नमुने देताना नमुना निवडीसाठी असे नमुने द्यावेत की पुरवठा आदेश मिळालेनंतर वर्षभर त्याच नमुन्याच्या मालाचा संस्थानला पुरवठा होईल.

**D.** **पुरवठा करावयाच्या साहित्यांचा तपशिल, निविदा फी व बयाणा रक्कम**

१. पुरवठा करावयाचे साहित्यांचा तपशिल BOQ मध्ये दिलेला आहे. त्यात ऑनलाईन दर नमूद करून निविदा ऑनलाईन भरावयाची आहे.

२. निविदा फी रक्कम रु.३०,०००/- व बयाणा रक्कम रु.३,००,०००/- मात्र www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन भरावी.

३. **MSME अंतर्गत निविदा फी व बयाणा रक्कम न भरण्याची सवलत या निविदेला लागू नाही. सर्व निविदाधारकांनी निविदा फी व बयाणा रक्कम भरणे अनिवार्य आहे.**

**E.** **निविदाधारकांसाठी सुचना**

१. सदर निविदा दि.२७/०१/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा.पासून दि.१४/०२/२०२६ सायं. ०५.०० वाजेपर्यंत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Downloading व Uploading साठी उपलब्ध राहील.

२. ई-निविदा भरलेल्या किराणा मालाचे व इतर अनुशंगिक साहित्याचे नमुने दि. १२ / ०२ /२०२६ ते दि. १४ / ०२ /२०२६ अखेर सायं. ५.०० वाजेपर्यंत (रविवार खेरीज) संस्थानचे शिर्डी येथील खरेदी विभागाचे कार्यालयात जमा करावेत.

३. ई-निविदेसोबत फक्त Online कागदपत्रे सादर करावयाची आहेत. Hard Copy मध्ये कागदपत्रे सादर करु नयेत. Hard Copy मध्ये सादर केलेल्या कागदपत्रांचा विचार केला जाणार नाही.

४. शक्य झाल्यास दि. १६ / ०२ /२०२६ रोजी Online Technical Bid उघडण्यात येईल. तांत्रिक निविदेत पात्र ठरलेल्या निविदाधारकाच्याच कमर्शिअल निविदा उघडण्यात येतील.

५. Commercial Bid उघडणेचे दिवशी आपण किंवा आपले प्रतिनिधींनी शक्य असल्यास उपस्थित राहणे आवश्यक आहे. ऑनलाईन निविदा सादर करताना निविदाधारकांनी आपले फोन नंबर्स ऑनलाईन निविदेमध्ये नमूद करावेतम्हणजे पात्र ठरणा-या निविदाधारकांना Commercial Bid उघडणेची तारीख व वेळ कळविता येईल.

६. नमुने नसलेली निविदा विचारात घेतली जाणार नाही.

**F. निविदेत ऑनलाईन दर भरतांना सर्व कर व खर्चासह दर नमूद करणे-**

१. निविदेमध्ये ऑनलाईन दर भरतांना GST, GST-TDS, TDS अगर इतर कुठलाही शासकीय कर तसेच पॅकिंग व फॉरवर्डिंग खर्च,जकात,वाराई वगैरे सर्व खर्चासह शिर्डी संस्थानचे भांडार विभागामध्ये पोहोच वाहतूक खर्चया सर्व बाबींचा विचार करूनच दर भरावेत.

२. शासन नियमानुसार वेळोवेळी लागू होणारे कर पुरवठाधारकावर बंधनकारक राहतील व त्याप्रमाणे रक्कम बीलातून कपात करण्यात येईल. शासनाने १ ऑक्टोबर २०१८ पासून करपात्र वस्तु/सेवा अथवा दोन्हीसाठी पुरवठादाराला करावयाचे प्रदानातुन २% GST-TDS वजा करणेबाबत परिपत्रक क्रं.२०१८०९२८१७१४३६६६०५ अन्वये निर्देशित केले आहे. त्याचाही निविदा भरतांना निविदाधारकाने विचार करावा. याबाबतची आधिक माहिती महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**G. ऑनलाईन निविदा उघडण्याची व नमुने निवडण्याची कार्यपध्दती-**

१. निविदेचा Download कालावधी संपल्यानंतर खरेदी समितीचे सभेत ऑनलाईन तांत्रिक ई-निविदा प्रथम उघडण्यात येतील. त्यानंतर तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या निविदाधारकांनी सादर केलेल्या मालाचे नमुने तज्ञ समितीमार्फत निवडण्यात येतील. नमुने निवडीबाबत तज्ञ समितीचा निर्णय अंतिम राहील.

२. नमुने निवडून अंतिम झालेनंतर कमर्शिअल बीड उघडण्यात येऊन नमुने निवड झालेल्या निविदाधारकांच्या त्या-त्या मालाच्या दरांचा तुलनात्मक दृष्टया विचार करण्यात येईल व यामधील न्युनतम दरधारकांचे दर मा.तदर्थ/मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे सादर करण्यात येतील व त्यानुसार अंतिम निर्णय घेतला जाईल.

**H. साहित्य पुरवठा करावयाचे ठिकाण-**

१. निविदेत नमूद केलेल्या मालाचा पुरवठा शिर्डी येथील संस्थानचे श्री साईमंदिराचे जवळील भांडार विभागामध्ये अगर बायपास रोडवरील संस्थानच्या गोडावूनमध्ये करावा लागेल. प्रसंगी लाडू, कॅन्टीन व प्रसादालय विभाग याठिकाणीही पुरवठा करावा लागेल.

...२...

**I. सुरक्षा अनामत रक्कम व करारनामा-**

१. शासनाच्या खरेदी नियमावलीप्रमाणे ज्यांच्या निविदा मंजूर होतील त्यांना विहीत मुदतीत मालाचा पुरवठा करावयाची हमी म्हणून एकुण पुरवठा आदेश रकमेच्या ३% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणूनसंस्थानकडे ठेवावी लागेल निविदा मंजूर झाल्याचे कळविलेनंतर त्वरीत सदर रकमेचा भरणा करावा लागेल. ही सुरक्षा अनामत रक्कम व्यवस्थितरित्या सदर साहित्याचा पुरवठा केलेनंतर आपण मागणी पत्र दिल्यानंतर परत करता येईल. सुरक्षा अनामत अगर बयाणा रकमेवर कुठल्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

२. निविदा मंजुर झालेनंतर ३% सुरक्षा अनामत रक्कम त्वरित भरावी लागेल. तसेच शिर्डी येथे समक्ष येऊन रु.५००/- चे स्टॅम्प पेपरवर त्वरित करारनामा नोटरी करुन देणे बंधनकारक राहील. करारनाम्याची नोटरी फी निविदाधारकास आदा करावी लागेल. करारनामा केल्याशिवाय बील आदा केले जाणार नाही.

**J. मालाचा पुरवठा करण्याची मुदत -**

१. माल पुरवठा करण्याचा प्राथमिक पुरवठा कालावधी १ एप्रिल २०२६ ते ३१ मार्च २०२७ असा राहिल.

२. माल पुरवठा मागणी चलनात दिलेले Schedule प्रमाणे अगरचलन दिलेपासून जास्तीत जास्त १० दिवसात मालाचा पुरवठा करावा लागेल. प्रसंगी दूरध्वनीवर कळविलेनुसार तात्काळ पुरवठा करावा लागेल.

३. नैसर्गिक आपत्ती, महामारी यामुळे जर मंदिर बंद ठेवावे लागले तर अशा कालावधीमध्ये ई-निविदेमध्ये खरेदी करण्यासाठी दर्शविलेले अंदाजे परिमाण (Estimated Quantity) प्रमाणे माल खरेदी करणे संस्थानवर बंधनकारक रहाणार नाही. प्रसादालयासाठी लागणा-या किराणामालाची आवश्यकता ही प्रसादभोजन घेणा-या साईभक्तांच्या संख्येवर अवलंबून असल्यामुळे ई-निविदेमध्ये दर्शविलेल्या अंदाजे परिमाणापेक्षा कमी किंवा जास्त मालाची गरज भासू शकेल. त्यामुळे ई-निविदेतील अंदाजे परिमाण (Estimated Quantity) इतका माल खरेदी करणे संस्थानवर बंधनकारक रहाणार नाही.

४. संस्थानची सदर मागणी ही अंदाजित असल्यामुळे पुरवठा कालावधीत अगर पुरवठा कालावधी संपल्यानंतरही पुढील वर्षाची खरेदी संबंधीत प्रक्रिया पुर्ण होईपावेतो आवश्यकतेनुसार मंजूर केलेल्या परिमाणापेक्षा २५ टक्केपर्यंत जादा मालाची मागणी संस्थानकडून झाल्यास त्या मालाचा पुरवठा मान्य दरानेच करणे निविदाधारकावर बंधनकारक राहील.

५. पुरवठा आदेश दिल्यानंतर पुरवठा आदेशात नमूद मालाचा पुरवठा हा एकदम करावयाचा नसून संस्थानचे गरजेप्रमाणे दरमहा मागणी चलन पुरवठादारास पाठविण्यात येतील. त्यामध्ये नमूद परिमाणाइतकाच मालाचा पुरवठा करावा लागेल. पुरवठा आदेशात नमूद केलेल्या परिमाण (Quantity) ही अंदाजे रहाणार असून भक्तांच्या संख्येनुसार प्रत्यक्ष मागणी अवलंबून रहाणार आहे. त्यामुळे ई-निविदा किंवा पुरवठा आदेशात नमूद मालाइतके परिमाण (Quantity) खरेदी करणे संस्थानवर बंधनकारक रहाणार नाही.

**K. मालाचा स्वीकार करण्याची पध्दत-**

१. पुरवठा आदेशातील वर्णनाप्रमाणेच व दिलेल्या नमुन्याप्रमाणे मालाचा/साहित्याचा पुरवठा करावा व त्याप्रमाणेच मालाचे/साहित्याचे बिल सादर करावे.

२. ज्या मालाच्या निविदा मंजूर होतील तो सर्व माल मान्य झालेल्या नमुन्याप्रमाणे त्याच दर्जाचा व जातीचा पुरवावा लागेल. कमी दर्जाचा, वेगळ्या प्रकारचा अगर जातीचा किंवा खराब माल स्विकारला जाणार नाही. असा माल पुरवठा झाल्यास तो स्वखर्चाने तात्काळ परत घेऊन जाणे व तातडीने चांगल्या दर्जाच्या मालाचा पुरवठा करणे निविदाधारकावर बंधनकारक राहील. खराब माल न नेल्यास, त्या मालाची नासधूस झाल्यास त्यास संस्थान जबाबदार राहणार नाही.

३. पुरवठाधारकाला पुरवठा आदेश दिलेनंतर संस्थानचे तज्ञ समितीने आपण दिलेल्या नमुन्यातून निवड केलेल्या नमुन्याप्रमाणेच वर्षभर माल पुरवणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहिल.

...३...

४. पुरवठा आदेशाप्रमाणे संस्थानकडे माल पाठविल्यानंतर संस्थानने विहीत केलेले यंत्रणेकडून मालाची तपासणी केली जाईल. त्यांना योग्य वाटल्यास माल स्विकारण्यात येईल. तथापि माल स्विकारलेनंतरही त्यातील माल खराब आढळयास तो तात्काळ बदलून दयावा लागेल. सबब पुरवठाधारकांनी दिलेल्या नमुन्याप्रमाणे माल पुरविण्याची दक्षता घ्यावी.

५. पुरवठा करीत असलेल्या मालाची Quantity जास्त असल्यामुळे, संस्थानकडून Randomly Sample घेऊन माल स्विकारला जातो. तथापी माल स्विकारलेनंतरही एखादा लॉट, गोणी अगर काही माल खराब आढळल्यास तो माल स्वखर्चाने तातडीने बदलून द्यावा लागेल.

६. सर्व माल निवडलेला (Sortex Clean) असावा.

७. माल पुरवितांना FSSAI कायदयातील तरतुदीनुसार मालाच्या गोणीवर Date of Packing, Weight and Best Before Date चा स्पष्ट उल्लेख असणे बंधनकारक राहील.

८. पुरवठा आदेशाप्रमाणे पुरवठा केलेल्या मालामध्ये भेसळ अथवा ते कमी प्रतीचे आढळल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित पुरवठाधारकाची राहील.

९. मालाचे पॅकिंगसाठी वापरण्यात येणारे मटेरीअल Food grade असावे.

१०. पुरविलेल्या मालाचे गोणीचे वजन वगळता येणारे वजन विचारात घेतले जाईल.

**L. <u>लॅब तपासणीची कार्यपध्दती-</u>**

१. पुरविलेल्या मालाच्या प्रत्येक बॅचची गरजेनुसार संस्थान प्रयोगशाळा/जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा/ NABL/केंद्र शासनाच्या/राज्यशासनाच्या मान्यता प्राप्त प्रयोगशाळेतून तपासणी करणेत येईल.

२. संस्थानने करुन घेतलेले लॅब तपासणीमध्ये पुरविलेल्या मालाचे रिपोर्ट FSSAI Standards नुसार नसल्यास सदर माल तातडीने बदलून द्यावा लागेल. सदर माल पुरवठा करण्यास विलंब झाल्यास त्यावर थेट ५ % दंड आकारण्यात येईल तसेच त्यादरम्यान संस्थानला बाहेरुन माल विकत घ्यावा लागल्यास जादा आलेल्या खर्चाची रक्कम अधिक पुरविलेला माल किंमतीच्या ५ टक्के दंड देय असलेल्या कुठल्याही मालाचे बील रकमेतून/सुरक्षा अनामत रकमेतून वसूल करण्यात येईल.

३. काही वेळेस लॅब रिपोर्ट येण्यासाठी विलंब होतो अशा वेळी जर आलेला माल वापरला गेला व नंतर लॅब रिपोर्ट FSSAI Standard प्रमाणे न आल्यास त्या लॉटमधील मालाच्या किंमतीच्या ५ टक्केपर्यंत दंड आकारला जाईल.

४. मालाचा लॅब रिपोर्ट FSSAI Standards नुसार न आलेस सदरपुरवठाधारकावर संस्थानकडून उचित कारवाई करणेबाबत निर्णय घेतला जाईल. याबाबत पुरवठादाराची कुठलीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.

५. संस्थान लॅबचा रिपोर्ट FSSAI Standard नुसार नसल्यास शासनाच्या शासकीय/NABL लॅबमध्ये भांडार विभागाकडून तेच सॅम्पल तपासणी करुन त्याची पुर्न खात्री करण्यात येईल. सदर लॅबचा तपासणी अहवाल अंतिम समजन्यात येईल.

**M <u>बील आदा करण्याची पध्दती-</u>**

१. शक्यतो पुरविलेल्या मालाचे बिल मालाची तपासणी करुन, त्याचा दर्जा व परिमाण योग्य असल्याची खात्री झाल्यावरच आदा करणेत येईल. मालाच्या पुरवठ्यापोटी आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

२. **पुरवठा केलेल्या मालाचे बील संस्थानकडे सादर केलेपासून ४५ दिवसांचे आत संबंधित पुरवठाधारकाला आदा करण्याचा प्रयत्न राहिल. तथापि तांत्रिक कारणांमुळे बील आदा करणेस विलंब झाला तरीही आपणास संस्थानने मागणी केलेल्या मालाचा पुरवठा थांबविता येणार नाही.**

...४...

३. निविदाधारकाने पुरविलेला माल संस्थानने नाकारला व त्यामुळे पुढील कालावधीसाठी संस्थानला बाजारभावाने दुसरीकडून माल खरेदी करावा लागल्यास त्यासाठी जादा आलेल्या खर्चाची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतुन अथवा संस्थानकडून देय असलेल्या इतर मालाच्या बिलातुन वसुल केली जाईल.

४. शासन नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व कर कपाती बिलातून करण्यात येतील.

N. **आपत्ती/ नैसर्गिक आपत्ती, नुकसान भरपाई व दंडात्मक कारवाईबाबतची तरतुद :-**

१. पुरवठा आदेशातील माल मुदतीत पुरविला नाही तर खालीलप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

| | |
|---|---|
| अ) पुरवठा न केलेल्या मालाची किंमत रु.२.०० लाखापेक्षा कमी असल्यास | प्रती आठवडा ०.५०% दराने जास्तीत जास्त १० % पर्यंत |
| ब) पुरवठा न केलेल्या मालाची किंमत रु.२.०० लाख किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास | प्रती आठवडा ०.५०% दराने जास्तीत जास्त ५ % पर्यंत |

२. माल पुरविणेचा आदेश दुरध्वनीवरुन अथवा मागणी चलनात दिलेले Schedule प्रमाणे अगर चलन दिलेपासून जास्तीत जास्त १० दिवसांचे आत मालाचा पुरवठा न झाल्यास अगर योग्य प्रतीचा नसल्यामुळे माल नाकारला गेल्यास संस्थानची अडचण होऊ नये म्हणून, संस्थानला बाजारभावाने आवश्यक तितका किंवा दिलेल्या आदेशा इतका माल दुसरीकडून खरेदी करण्याची मुभा राहील. अशा खरेदी केलेल्या मालासाठी जादा लागलेल्या रकमेची (फरकाची) भरपाई निविदाधारकाने संस्थानला करुन दयावयाची आहे. **दुरध्वनी/ई-मेलद्वारे कळविलेल्या विहित मुदतीनंतर, विलंबाने पुरवठा केलेल्या मालावर थेट ५% दंड आकारण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदरची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतून अगर पुर्वीच्या/नंतरच्या आलेल्या मालाच्या बिलातून वसुल करण्याचा अधिकार संस्थानला राहील.**

३. निविदेतील मंजूर दराने व निवडलेल्या नमुन्याप्रमाणे माल पुरवठा करणे बंधनकारक आहे. मंजूर दरामध्ये कोणत्याहीकारणास्तव भाववाढ मागण्याचा अधिकार पुरवठाधारकास असणार नाही अथवा अशा प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही. पुरवठाधारकाने माल पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा माल पुरवठा न केल्यास संस्थानला बाजारभावाने अथवा फेरनिविदा मागणी करुन माल खरेदी करावा लागल्यास जादा येणा-या खर्चाची नुकसान भरपाई पुरवठाधारकाकडून वसुल केली जाईल. अगर याबाबत संस्थानच्या मा.तदर्थ समिती/ मा.व्यवस्थापन समिती/मा.उपसमिती/मा.मुख्य कार्यकारी महोदय यांनी घेतलेले निर्णयाप्रमाणे उचित कारवाई करण्यात येईल. याबाबत पुरवठाधारकाची कुठलीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

४. निविदा पुरवठा कालावधीमध्ये एखादी आपत्ती/ नैसर्गिक आपत्तीमुळे (अशी आपत्ती की जी पुरवठाधारकांच्या नियंत्रणाबाहेर असेल. उदा.युद्ध, अतिवृष्टी, दुष्काळ, अपहरण, घातपात, रोगराई, संप, स्फोट, टाळेबंदी, भूकंप वगैरे) पुरवठाधारक मालाचा पुरवठा करु शकला नाही व तसे पुरवठाधारकाने संस्थानला त्वरीत लेखी कळविले तर याबाबत योग्य तो निर्णय परिस्थितीनुरुप घेण्यात येईल. तथापि सदर तरतूद ही फक्त पुरवठा करण्यात झालेला विलंब क्षमापित करण्याइतपत मर्यादित असून उपरोक्त परिस्थितीत मंजूर दरापेक्षा बाजारात भाववाढ झाल्यास त्यासाठी लागू राहणार नाही. पुरवठादाराला बाजारात भाववाढ झाली तरीही मंजुर दराने पुरवठा करणे बंधनकारक आहे. पुरवठादाराने पुरवठा न केल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल अगर मा.तदर्थ समिती/मा.व्यवस्थापनसमिती/मा.उपसमिती/मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जो निर्णय घेतील तो पुरवठाधारकावर बंधनकारक राहील. याबाबत संबंधिताची कुठलीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

५. निविदाधारकाने स्वत:साठी अगर निविदाधारकासाठी कुणीही कोणत्याही स्वरूपाचा, कोणत्याही कारणास्तव संस्थानचे विरोधात केलेला दावा/अर्ज कोणत्याही न्यायालयात प्रलंबीत नसावा. तसेच निविदाधारकाचे नाव संस्थानचे काळया यादीत समावेश नसावे. जर संस्थान विरोधात दावा दाखल केलेला असल्यास सदर निविदाधारकांच्या निविदेचा विचार करण्यात येणार नाही.

...५...

## O निविदा वैधता कालावधी-

१. सदर ई-निविदेचा वैधता कालावधी ऑनलाईन निविदेच्या अंतिम तारखेपासून १२० दिवसांचा राहील.

## P. विशेष अटी शर्ती

१. निविदेत सहभागी निविदाकाराने निविदा प्रक्रियेमध्ये कोणत्याही टप्प्यावर निविदेतून माघार घेतल्यास त्यांची बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

२. पुरवठादाराचे/ संस्थेचे आवश्यकता वाटल्यास Vendor Audit केले जाईल.

३. सदरील व्यवहाराबाबत वाद निर्माण झाल्यास तो राहाता कोर्टाचे न्यायकक्षेत राहील.

४. राज्याबाहेरील निविदाकाराची निविदा मंजुर झाल्यास शासनाचे सुधारित खरेदी नियमावलीतील नियम क्र.३.१.२.८ नुसार राज्याबाहेरील पुरवठादार जर न्युनतम असला व महाराष्ट्र राज्यातील पुरवठादार व्दितीय न्युनतम असला तर महाराष्ट्र राज्यातील पुरवठादारांना प्रोत्साहन देण्यासाठी, महाराष्ट्र राज्यातील व्दितीय न्युनतम दरधारक जर न्युनतम दरधारकांच्या दरात माल पुरविण्यास तयार असेल तर एकूण खरेदी करावयाच्या मालाच्या ५० टक्के मालाचा पुरवठा आदेश राज्यातील पुरवठादाराला देण्यात येईल व ते जर तयार नसतील तर पुर्ण मालाचा पुरवठा आदेश राज्याबाहेरील पुरवठादाराला देण्यात येईल.

५. पुरवठादाराने मालाचा पुरवठा करावयाचे नाकारल्यास तसेचसंस्थानने नमूद केलेले कुठल्याही अटी-शर्तींचा भंग झाल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येऊन सदर पुरवठाधारकाचे नांव पुढील ३ वर्षासाठी काळया यादीत समावेश केले जाईल. अगर याबाबत मा.तदर्थ समिती/मा.व्यवस्थापन समिती/मा.उपसमिती/मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जो निर्णय घेतील तो आपणावर बंधनकारक राहील. याबाबत पुरवठाधारकाची कुठलीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

६. कोणतीही निविदा अंशतः/पुर्णतः स्विकारणे/नाकारणे किंवा सर्व निविदा नाकारणेचा हक्क संस्थान प्रशासनाने राखून ठेवलेला आहे. तथापि निविदा फी कुठल्याही परिस्थितीत वा कारणास्तव परत केली जाणार नाही.

७. सशर्त निविदा तात्काळ रद्द करण्यात येतील. सदर निविदेतील नमूद अटी-शर्ती व अर्हता पुर्ण करू न शकलेल्या निविदाधारकांच्या निविदा रद्द करण्यात येतील.

८. उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करणे वा जादा अटी/शर्ती विहीत करण्याचा अधिकार संस्थान प्रशासनाने राखून ठेवलेला आहे. निविदाधारकाची कोणतीही अट/अटी संस्थानवर बंधनकारक राहणार नाही, अशा निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

९. **खरेदी विभागाकडून मालाच्या पुरवठ्यासाठी वेळोवेळी केलेल्या ई-मेल व भ्रमणध्वनी आणि दुरध्वनीवरील संवाद/पत्रव्यवहार हा कुठल्याही कायदेशीर कारवाईसाठी (Legitimate Actions) अत्यंत महत्वाचा भाग म्हणून गणण्यात येईल याची प्रथम प्राधान्याने नोंद घ्यावी.**

१०. पुरवठा केलेला माल प्राप्त झालेपासून ३० दिवसांच्या कालावधीत खराब आढळून आल्यास किंवा झाल्यास सदरचा माल पुरवठादारास बदलून द्यावा लागेल.

११. पुरवठा केलेला माल आपण ई-निविदेसोबत दिलेल्या नमुन्याप्रमाणे नसल्यास मालाचा पुरवठा स्वीकारण्यात येणार नाही. सदरचा माल रिजेक्ट करण्यात येईल त्या परिस्थितीत पुरवठादारास नमुन्याप्रमाणे तातडीने सदर मालाचा पुरवठा करावा लागेल त्यासाठी अवधी देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

१२. मालाचा पुरवठा केल्यानंतर मालाची पोहच ई-मेलद्वारे पुरवठादारास पाठविण्यात येईल त्याप्रमाणे देयक/बील तातडीने पाठविण्याचे करावे. बील विलंबाने प्राप्त झाल्यास, त्यावर करावयाच्या कर कपातींमुळे वा इतर कारणांमुळे होणा-या कुठल्याही नुकसानीस पुरवठादार स्वत: जबाबदार राहील.

१३. विलंबाने वा नमुन्याप्रमाणे मालाचा पुरवठा न झाल्यास त्यावर थेट ५% दंड पुर्वीच्या/नंतरच्या आलेल्या देयकातून/बीलातून/सुरक्षा अनामत रकमेतून कपात करण्यात येईल. याबाबत कुठलीही पुर्व सुचना पुरवठादारास अलहिदा देण्यात येणार नाही.

१४. मसाल्यांचा पुरवठा हा श्री साईभक्तांच्या गर्दीवर अवलंबून असल्याने, मासिक पुरवठा चलन ई-मेलद्वारे प्राप्त झालेनंतर, पुरवठादाराने मासिक मालाची तजवीज करुन ठेवावी मात्र कुठलाही माल पाठविण्यापुर्वी त्याची पुर्व कल्पना खरेदी विभागास द्यावी लागेल. पुरवठ्यापोटी खरेदी विभागाच्या सुचनेप्रमाणे मालाचा पुरवठा करावा लागेल.

१५. पुरवठादाराने/ निविदाकाराने ई-निविदे सोबत मालाचे नमुने सादर करतांना असे मालाचे नमुने सादर करावेत जे वर्षभर उपलब्ध असतील व त्याप्रमाणेच पुरवठादारास संस्थानला मालाचा पुरवठा करता येईल. केवळ निविदा मिळविण्याच्या हेतून उच्चतम मालाचा नमुना व न्युनतम दर सादर करण्याचा प्रयत्न प्रकर्षाने टाळावेत याची प्रथम प्राधान्याने नोंद घ्यावी.

(गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी

# निविदाधारकाबाबत माहिती

| | | |
|---|---|---|
| १. | फर्मचे नांव- | ------------------------------------------------------------ |
| २. | पत्रव्यवहारासाठी संपुर्ण पत्ता- | ------------------------------------------------------------ |
| ३. | दूरध्वनी क्रमांक- | ------------------------------------------------------------ |
| | ऑफीस- | ------------------------------------------------------------ |
| | दुकान- | ------------------------------------------------------------ |
| | निवास- | ------------------------------------------------------------ |
| | मोबाईल नंबर- | ------------------------------------------------------------ |
| | फॅक्स नंबर- | ------------------------------------------------------------ |
| | ई –मेल | ------------------------------------------------------------ |
| ४. | संपर्कासाठी व्यक्तीचे नांव- | ------------------------------------------------------------ |
| | दूरध्वनी/ मोबाईल क्रमांक- | --------------------------------------------------------- |
| ५. | मालकाचे/भागीदारांची नावे १. | ------------------------------------------------------------ |
| | २. | ------------------------------------------------------------ |
| ६. | बँक खाते नांव | १.------------------------------------------------------------ |
| | शाखा | २. ------------------------------------------------------------ |
| | खाते नंबर व प्रकार | ३.------------------------------------------------------------ |
| | आयएफएससी कोड | ४.------------------------------------------------------------ |

दिनांक :- / /२०२६

ठिकाण :- निविदाधारकाची सही व शिक्का

अ) **Technical Bid मधील कागदपत्रे (चेक लिस्ट)**

१. अदययावत दुकान नोंदणी दाखला/स्थानिक स्वराज्य संस्थेचा दाखला/तत्सम शासकीय परवाना/ भागीदारी संस्था असल्यास अद्यावत भागीदारी प्रमाणीत( पॉवर ऑफ अटर्नी) केल्याची प्रत/ संस्था, कंपनी नोंदणी प्रमाणपत्र/खाजगी कंपनी प्रमाणपत्र / सोसायटी /गव्हर्मेंट अन्डरटेकींग/ कंपनी नोंदणी प्रमाणपत्र /पार्टनरशिप डिड ( निबंधकाकडून नोंदणी केलेल्या ), आर्टीकल ऑफ असोसिएशन, सोसायटी रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र

२. GST नोंदणी दाखला/GST Online Registration Acknowledgement

३. पॅन कार्ड

४. २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५ या ३ आर्थिक वर्षाची सरासरी वार्षिक उलाढालीबाबतचेचार्टर्ड अकाऊंटन्ट यांचे प्रमाणपत्र (किमान वार्षिक उलाढाल **रू.१,२५,००,०००/-** असणे अनिवार्य)

५. अदयावत अन्न आणि औषध प्रशासन नोंदणी परवाना(FSSAI परवाना)

६. **हमी पत्र/ निविदा स्वीकृती पत्र** निविदा पान क्रं- १०

**ब) मालाचे नमुने स्वतंत्र कापडी पिशवीमध्ये वरच्या बाजुस मालाचा प्रकार, फर्मचे नांव इ. तपशिलासहस्वाक्षरी करुनसिलबंद असलेले**

**क) नमुने दिलेल्या मालाची यादी**

दिनांक - / /२०२६
ठिकाण -

निविदाधारकाची सही व शिक्का

## हमी पत्र/ निविदा स्वीकृती पत्र

प्रति,
मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)
शिर्डी, ता.राहाता, जिल्हा-अहिल्यानग.

**विषय– एप्रिल २०२६ ते मार्च २०२७ करिता प्रसादालय, लाडू निर्मिती, कॅन्टीन व मंदिर विभागांसाठी मसाले पुरविण्याचे ई-निविदेबाबत...**

महोदय,

खालील सही करणार मी/आम्ही कळवितो की, वरील विषयाबाबत आपण प्रसिद्ध केलेली निविदा वाचली. आपल्या निविदेत दिलेल्या सर्व अटी व शर्ती मी/आम्ही वाचल्या असून मला /आम्हाला मान्य आहेत. आपले अटी/शर्तींचे पालन करावयाचे मी/आम्ही मान्य करीत आहे/आहोत.

मी/आम्ही आपणांस निविदेमध्ये नमुद केलेल्या मालाचा, आपल्या मागणीप्रमाणे उपरोक्त कालावधीकरिता, संस्थानचे आवश्यकतेनुसार, आवश्यक त्यावेळी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) यांचे भांडार पोहोच करण्याची हमी देतो. सदर मालाचे परिमाण अंदाजे असल्यामुळे निविदा कालावधीत अगर निविदा कालावधी संपल्यानंतरही पुढील खरेदी प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत नमुद केलेल्या परिमाणापेक्षा २५% पर्यंत जास्त मालाची संस्थानतर्फे मागणी झाल्यास मी/आम्ही तो मंजुर दराने पुरविण्याची हमी देत आहे/आहोत.

ज्या मालाच्या निविदा मंजुर होतील, त्या मान्य दराने मालाचा पुरवठा करण्याची हमी म्हणून, मंजुर मालाच्या एकुण रकमेच्या ३% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून निविदा मंजुर झाल्याचे कळविल्यापासून १५ दिवसांचे आत मी/आम्ही रोख भरणा करु.याकरीता बयाणा रक्कम सुरक्षा अनामत खाती वर्ग करण्यास माझी संमती आहे. तसेच विहित केलेले स्टॅम्प पेपरवर करारनामा नोटरी करुन देऊ व त्याप्रमाणे मंजूर दराने निविदा कालावधीत नमुन्याप्रमाणे माल वेळेवर शिर्डी येथील मध्यवर्ती भांडार विभागात पोहोच करणे आमचेवर बंधनकारक राहील.

दिनांक - / /२०२५
ठिकाण -

आपला/आपले विश्वासू,

फर्मचे मालकाचे/भागीदाराचे नांव

सही/सहया व शिक्का

(१) ----------------------------------

(२) ----------------------------------

**सोबत-** कागदपत्रे

# वार्षिक उलाढालीबाबतचे प्रमाणपत्र

दाखला देण्यात येतो की, मे. ------------------------------------------------ यांचे निविदेसंबंधित व्यवसायाची सन २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५ या ३ वर्षांची आर्थिक उलाढाल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं | वर्ष | वार्षिक उलाढाल |
|---|---|---|
| १ | सन २०२२-२३ | |
| २ | सन २०२३-२४ | |
| ३ | सन २०२४-२५ | |
| | एकुण | |
| | ३ वर्षांची सरासरी वार्षिक उलाढाल | |

लेखापरीक्षकाची सही/चार्टर्ड अकाऊंटंट
(नाव/ सही शिक्का)
नोंदणी क्रमांक.

दिनांक :- / /२०२६
ठिकाण :-

**SHREE SAIBABA SANSTHAN TRUST, SHIRDI**

At/post-Shirdi, Tal-Rahata, Dist- Ahilyanagar- 423109

Phone No.(02423) 258500/771/772, Fax No.02423-258870

(Website www.sai.org.in , E-mail – purchase@sai.org.in)

---

**E-TENDER NOTICE**

E-tenders are invited from Supplier/Manufacturers/Dealers for the supply of Grocery & Other material for our Prasadalaya, Ladu Nirmiti, Canteen & Temple Department for the year 2026-27.

1. E-Tender Information, Criteria and terms- conditions are available on Sansthan's website www.sai.org.in
2. The E-Tender is available for Downloading & Uploading from 27/01 /2026 11.00 AM to 14 / 02 /2026 up to 5 PM. on Government website **www.mahatenders.gov.in**

**(Goraksha Gadilkar, I.A.S)**
**CHIEF EXECUTIVE OFFICER**

# SHREE SAIBABA SANSTHAN TRUST, (SHIRDI)

**SHIRDI – 423109**

**TAL-RAHATA, DIST.-AHILYANAGAR**

Telephone No.(02423) 258500, Purchase Dept. 258771, 258772
Fax No.02423- 258870
Website – www.sai.org.in E-mail 1.saibaba@sai.org.in
2.purchase@sai.org.in

**Mumbai Office – Sainiketan, 804 B, Dr.Babasaheb Ambedkar Road, Dadar Mumbai – 400014, Telephone No.**(022) 24166556, 24161293

Year 2026-27

(April 2026 to March-2027)

E-Tender for supplying of Spices to Prasadalaya, Dept. of Shree Saibaba Sansthan

**A. TENDER DETAILS- E-Tender for Supply of Spices for Prasadalaya, Ladoo, Canteen and Temple Departments of Shree Saibaba Sansthan.**

**B. Details of documents to be submitted along with e-tender, financial turnover criteria etc. are as follows-**

1. It will be mandatory to submit shop registration certificate/ certificate from local self-government body/ similar government license /Certified copy of latest partnership deed in case of partnership firm/ Firm/Company/Sanstha Registration Certificate. i.e. Power of attorney in case of Partnership firm/Public Limited Company/ Private Limited Company/Society/Government undertaking/ Company Registration Certificate/Partnership Deed, duly registered with Registrar, Articles of Association, Society Registration Certificate as the case may be.
2. It will be mandatory to submit the GST Registration Certificate or GST Online Registration Receipt online in the name under which the tender is to be submitted.
3. Online submission of updated FSSAI license in the name under which the tender is to be submitted will be mandatory.
4. It will be mandatory to submit PAN card online in the name in which the tender is to be submitted.
